पूर्व मंजूरीसाठी

**प्रकल्प प्रवर्तक मे. जोरिंको स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड (जे.एस.पी.एल.) गट नं. ३५१/१, इंडस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या शेजारी, मौजे - भरे, तालुका - मुळशी, जिल्हा-पुणे- ४११ ०४५, महाराष्ट्र यांच्या फॅटी ॲसिड्स आणि फॅटी अल्कोहोल ऑफ व्हेजिटेबल ऑईलच्या मिश्रणातून उत्पन्न केलेल्या शुध्द एस्टरच्या प्रस्तावित उत्पादनाच्या प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्त-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. जोरिंको स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड (जे.एस.पी.एल.) गट नं. ३५१/१, इंडस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या शेजारी, मौजे - भरे, तालुका - मुळशी, जिल्हा-पुणे- ४११ ०४५, महाराष्ट्र यांच्या फॅटी ॲसिड्स आणि फॅटी अल्कोहोल ऑफ व्हेजिटेबल ऑईलच्या मिश्रणातून उत्पन्न केलेल्या शुध्द एस्टरच्या प्रस्तावित उत्पादनाच्या प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळ - मे. जोरिंको स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड (जे.एस.पी.एल.) गट नं. ३५१/१, इंडस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या शेजारी, मौजे - भरे, तालुका - मुळशी, जिल्हा-पुणे- ४११ ०४५, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री विद्यासागर किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ज्योती कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रतिनिधी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री रणजीत भोसले, तहसीलदार, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे, श्री सुयोग बेंद्रे, नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय-पुणे, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणीची प्रक्रिया सुरु केली.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. जोरिंको स्पेशालिटीज प्रायव्हेट लिमिटेड (जे.एस.पी.एल.) यांचा त्यांच्या गट नं. ३५१/१, इंडस बायोटेक प्रायव्हेट लिमिटेडच्या शेजारी, मौजे - भरे, तालुका - मुळशी, जिल्हा-पुणे -४११ ०४५,

महाराष्ट्र येथे फॅटी ऍसिड्स आणि फॅटी अल्कोहोल ऑफ व्हेजिटेबल ऑईलच्या मिश्रणातून उत्पन्न केलेल्या शुध्द एस्टरच्या प्रस्तावित उत्पादनाच्या प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

संयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १७-०४-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक ०७-०५-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार , दिनांक २२ डिसेंबर, २०२३ रोजी दुपारी १२. ०० वाजता घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ९० /२०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३१२१४ एफटीएस -०२११ दिनांक - १४-१२-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी,पुणे, — **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई — **सदस्य**
यांचे प्रतिनिधी -
प्रादेशिक अधिकारी -पुणे,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे.

३) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२ - संयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे.

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत २२-११-२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.
२) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे.
३) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे.
४) प्रादेशिक कार्यालय, पुणे व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-२, म.प्र.नि. मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३.
५) मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ८, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२.
६) झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर- ४४० ००१.
७) पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
८) उपविभागीय अधिकारी मावळ- मुळशी, उपविभाग पुणे, तलाठी प्रशिक्षण केंद्र, बावधन, ता. मुळशी, जि.पुणे.
९) तहसिलदार मुळशी, तहसिल कार्यालय मुळशी (पौड), ता.मुळशी, जि. पुणे.
१०) ग्रामपंचायत कार्यालय:- भरे, पिरंगुट व मुकाईवाडी, कासार-आंबोली, उरवडे, अंबडवेट, लवळे, भुकुम, घोटावडे, पौड, नांदे, चांदे, भुगाव, दारवली, ता.मुळशी , जि. पुणे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना ०३ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

संयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

संयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या

समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचा एकूण किंमत रुपये ४१.२ कोटी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये ५.४ लाख तर आवर्ती खर्च - रुपये २.० लाख रुपये आहे. प्रकल्पात बांधकाम आणि ऑपरेशनल टप्प्यात ५५ व्यक्तींची गरज असून स्थानिक मनुष्यबळ घेण्यास प्राधन्य देण्यात येईल.

सादरीकरणानंतर संयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप, वैयक्तिक मत, सूचना किंवा आक्षेप नोंदवायचे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत असे सांगितले. सर्वांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे आहेत, ते त्यांनी सादर करावेत. त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखीस्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून ते बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास सादर करण्यात येईल. तरी एकाएकाने येऊन लेखी निवेदन सादर करावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री राहूल डिग्रज, राहणार-पुणेः-</u>

प्रकल्पातील उत्पादने कशाप्रकारे वापरण्यात येणार आहेत याविषयी माहिती सांगण्यात यावी.

- **प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की, प्रकल्पातील उत्पादन हे वैयक्तिक वापरासाठीच्या औषधे निर्माण कंपन्या (Pharmaceuticals), ल्युब्रिकंटस्, फ्लेव्हर (Flavors), विविध सुवास (Various fragrances), घरगुती वापरातील कॉस्मेटीक्स, ऑईल्स, लोशन्स, शिवाय फार्मामधील उत्पादने यांच्या प्रकल्पासाठीचा लागणारा बेसिक कच्चा माल आहे. आमचे उत्पादने हे विविध कंपन्यामध्ये बेबी-केअर, स्कीन-केअर यात वापरण्यात येतील. तसेच त्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन येथे होणार आहे.

२) <u>श्री शाम चंद्रकांत धुमाळ, राहणार -कासार अंबोली, ता.-मुळशी, जि.-पुणे:-</u>

या परिसरात अनेक कंपन्या असून ही नविन कंपनी चालू होत आहे. आम्ही या नविन कंपनीचे स्वागत करतो. परंतु असा अनुभव आहे की येथे कंपन्या येतात, नफा कमावतात, पण स्थानिक ग्रामपंचयतींच्या गरजांचा विचार करत नाही. तर येथील ग्रामस्थांना काय देणार हा विचार होणे आवश्यक आहे. कारण प्रकल्पासाठी ग्रामपंचायत हद्दीतील जमिन घेतली जाते. हवा, पाणी प्रदूषित होण्याची शक्यता असते. विकासासाठी कंपन्या आवश्यक आहेत, पण ग्रामस्थांबाबत कंपनी काय विचार करते याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

- **पर्यावरण सल्लागार यांनी** सांगितले की, पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) साठी प्रकल्प प्रवर्तक हे ८२ लाख ४० हजार खर्च करणार आहेत. यामध्ये सुमारे ७.४ लाख रुपये पर्यावरण संरक्षणासाठी प्रकल्प बांधकाम टप्प्यात असतानाच खर्च करणार आहोत. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सुमारे ७५.० लाख रुपये खर्च करणार आहोत. त्यात प्रकल्प पायाभूत सुविधांसाठी खर्च, हॉस्पिटल, शैक्षणिक सुविधांचा समावेश आहेत. जसे जसे प्रकल्पाची सुरवात होईल, त्याप्रमाणे स्थानिकांच्या गरजा व मागण्यांनुसार खर्च करण्यात येईल. त्यासाठी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय यांच्याशी प्रथम चर्चा करण्यात येईल आणि लोकांच्या गरजेनुसार निधी खर्च करण्यात येईल.
- येथे **अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** विचारणा केली की तुमचा जो ८२ लाख रुपयांचा निधी आहे, तो प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी खर्च करणार किंवा फक्त एक वेळेसच खर्च करणार.
- **प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की, हा खर्च एकदाच प्रकल्पाच्या खर्चानुसार म्हणजे कॅपिटल कॉस्ट नुसार करण्यात येईल. त्यानंतर रिकरिंग खर्च जो आहे, तो प्रकल्पाच्या नफ्याच्या २% करण्यात येईल.
- यावेळी **संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की, पर्यावरण संदर्भात पर्यावरण व्यवस्थापन योजनेंतर्गत जो खर्च करणार आहात, तो मा. जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीनेच खर्च करावा लागतो. सर्व स्थानिक प्रस्ताव हे मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे जातात आणि मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसारच त्या विशिष्ट कामासाठी खर्च करावा लागतो.

३) <u>प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>

प्रकल्पातील कच्चा मालाच्या सुरक्षितता (safety) व साठवण (storage) याबाबत कुठलीच माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालात दिलेली नाही. याबाबत

स्पष्टीकरण देण्यात यावे, कारण उत्पादन प्रक्रियेत वापरणारा कच्चा माल हा स्फोटक (Explosive) आणि जीवनावश्यक वस्तू (essential commodities) या संवर्गात मोडू शकतो.

- **प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की, या प्रकल्पास पेसोची (Petroleum & Safety Organization) तात्पुरती परवानगी (Provisional Permission) मिळालेली आहे.
- **प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात उल्लेख करण्याच्या सूचना दिल्या.
- **प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी पुढे सांगितले की प्रकल्पाच्या १०.० कि.मी. परिघात जी काही संवेदनशील स्थाने (sensitive locations), पुरात्तव स्थाने (archeological locations) यांचा कुठेही उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. जर ती असतील तर हो म्हणा, नसतील तर नाही म्हणा.
- **पर्यावरण सल्लागार यांनी** सांगितले की, पुरातत्व स्थाने (archeological locations) ही प्रकल्प स्थानाच्या १५ कि.मी. परिघात नाही. तरी याचा उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात करण्यात येईल.
- **प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी पुढे सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक झेडएलडी प्रकल्प (शून्य द्रव निःस्सारण) प्रस्तावित असल्याचे सांगतात, परंतु प्रस्तावित प्रकल्प तसा नाही. कारण प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत जर १००% पुनर्वापर करणार असाल, तरच प्रकल्प झेडएलडी होऊ शकतो. प्रक्रिया केलेले सांडपाणी हे प्रकल्पातील हरितपट्टा विकसनासाठी वापरण्याची परवानगी मिळणार नाही. तरी ईआयए अहवालात आपण जी झेडएलडी संकल्पना दिलेली आहे, ती बदलण्यात यावी अशी सुचना केली.
- या ठिकाणी **पर्यावरण सल्लागार यांनी** सांगितले की प्रकल्पात उत्पन्न झालेले सांडपाण्याचा प्रक्रियेनंतर उत्पादनात पुनर्वापर करण्यात येईल, प्रकल्पातील हरितपट्टा विकसनासाठी वापरण्यात येणार नाही.
- **प्रतिनिधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** याबाबत ईआयएमध्ये उल्लेख करण्याची सूचना केली.

४) <u>अध्यक्षा,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>

सदरहू प्रकल्पासाठी किती पाणी लागेल, पाण्याची उपलब्धता आहे का व पाणी कोठुन घेणार याबाबतचे नियोजन याबाबत माहिती देण्यात यावी. ईआयए मध्ये याचा काहीही उल्लेख नाही. त्याचप्रमाणे प्रकल्पासाठी लागणारी उर्जा ही कशी उपलब्ध करणार, म्हणजे सौर उर्जेचा वापर करणारा आहात का किंवा सर्व उर्जा ही महावितरण कडून घेणार याचा उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही.

- **प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की, सोलर पॅनेल बसविणे प्रस्तावित आहे. त्यावेळी **अध्यक्षा,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सूचना केली की किती उर्जा उत्पन्न करणार व किती महावितरणकडून घेणार ही माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंदविण्यात यावी.
- **पर्यावरण सल्लागार यांनी** स्पष्टीकरण दिले की, आमची पाण्याची गरज ही ३१.० केएलडी आहे. ग्रामपंचायत पाणी उपलब्ध करुन देणार आहे. ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र अदा केलेले आहे. जर काही कारणांमुळे ग्रामपंचायत पाणी उपलब्ध करु शकली नाही, तर स्थानिक वॉटर टँकर्सबरोबर पाणी पुरविण्याची सहमती झालेली आहे. फक्त ३१.० केएलडी पाणी लागेल, म्हणजे तीन टँकर्स रोज लागतील की जे शहरातील मोठ्या सोसायटीलासुध्दा लागतात.
- **प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले संपूर्ण प्रकल्पासाठी महावितरणने वीजपुरवठा संमती प्रदान केलेली आहे. सोलरचा अहवालात उल्लेख नाही. तर संपूर्ण क्षेत्र मोजण्यात येईल आणि दक्षिण दिशेला असलेले छत/रुफ वर सोलर पॅनेल बसविण्यात येतील.

**अध्यक्षा,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी विचारणा केली की, जर कच्चा माल साठवणुकीसाठी पेसोची परवानगी घेतलेली आहे, तर त्यासांठी अपर जिल्हादंडाकारी कार्यालयाची परवानगी घेतलेली आहे काय?

- **प्रकल्प प्रवर्तक यांनी** सांगितले की पेसोच्या तात्पुरत्या परवानगी पत्राची प्रत ही जिल्हादंडाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आलेली असून त्यांनी त्या तात्पुरत्या संमतीपत्राची प्रत पोलिस प्रशासन (ग्रामीण), रस्ते विभाग अशा विविध अधिसूचित शासकीय कार्यालयांना पाठविलेली आहे.
- **अध्यक्षा यांनी** मत मांडले की, अंतिम संमती अजून मिळालेली नाही. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की प्रकल्प बांधकाम सुरवात झाल्यानंतर टँकिंग सुविधा बांधण्यात येईल. त्यानंतर अंतिम परवानगीच्या प्रक्रियेस सुरवात होईल.

५) <u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राज्य-तेलंगणाः-</u>

सर्वांना नमस्कार. मी पर्यावरणवादी आहे. मात्र इतर पर्यावरणवादी हे प्रकल्पास, औद्योगिकीकरणास विरोध करतात. मात्र मी प्रकल्पास पाठिंबा देतो. कारण मी वास्तववादी आहे. मी भारत सरकारला प्रकल्पास मंजूरी देण्याची शिफारस करतो. माझ्यादृष्टीने बेकारी हे समाजातील सर्वात मोठे प्रदूषणच आहे. मात्र प्रकल्पात पर्यावरण नुकसान होऊ नये म्हणून काळजी घेण्यात यावी. त्यासाठी मी काही सूचना देत आहेः-

भारत सरकारच्या निर्देशांप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पात ३३% हरितपट्टा विकसित करणारच आहे. मात्र मी विनंती करतो की जर शक्य असेल तर हरित पट्टा विकास जास्त

प्रमाणात म्हणजे ४५-५०% पर्यंत करण्यात यावा. कारण १९८६ साली जेव्हा ३३% हरितपट्टा विकसित करणा-याचा कायदा अस्तित्वात आला, तेव्हा भारताची लोकसंख्या ही ६० कोटी होती, आता ती १४० कोटी आहे. त्यामुळे पर्यावरण असंतुलन झालेले आहे. तरी हरितपट्टा विकसित करताना स्थानिक एनजीओंची मदत घेण्यात यावी. त्याचप्रमाणे हरितपट्टा विकसन करताना फळे असलेली झाडे आणि औषधी वनस्पती यांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात यावी. त्यासाठी जास्त खर्च होणार नाही, कारण शासकीय विभाग अशी रोपटी पुरवितात.

तसेच जल संवर्धन हेही महत्वाचे आहे. या क्षेत्रात अंदाजे अर्धा ते एक कोटी लिटर पावसाचे पाणी मिळते. याठिकाणी जल संवर्धन आणि जल साठवणूक हे महत्वाचे आहे. त्यासाठी सीएसआर निधी वापरण्यात यावा. जलसंवर्धन व जल साठवणूकीमुळे परिसरातील भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होईल. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनाबद्दल विश्वासहर्तता मिळेल.

प्रकल्प व्यवस्थापनाने सीएसआर निधी खर्च करण्यासाठी समन्वयक समिती गठीत करावी, त्यात स्थानिक लोकप्रतिनिधी, कंपनी प्रशासन, स्थानिक शासकीय अधिकारी, स्थानिक पोलिस प्रशासन यांचा समावेश करण्यात यावा. समन्वय समितीच्या माध्यमातून लोकांच्या गरजांनुसार सीएसआर निधी खर्च करण्यात यावा.

विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिर आयोजित करण्यात यावे, त्याचबरोबर वेळोवेळी आरोग्य प्रतिकार शक्ती जागृत्ती कार्यक्रम राबविण्यात यावा. गेले अनेक वर्षे असे निदर्शनास येते की पर्यावरणवादी व एनजीओ हे जनतेच्या आरोग्यविषयक तक्रारीबद्दल प्रकल्पांना जबाबदार धरतात. मी त्या विचारांशी/वादाशी सहमत नाही. कारण भारतात फक्त १५-२०% लोक हे प्रकल्पाच्या बाजूस/क्षेत्रात राहतात. म्हणजे समजा भारतात २०% लोकांना जर औद्योगिकीकरणाचा त्रास होत असेल, तर उर्वरित ८०% लोकांच्या आरोग्याच्या तक्रारीबाबत प्रकल्पांना जबाबदार धरणे हे चुकीचे आहे.

मी भारत सरकारला सदरहू प्रकल्पास मान्यता देण्याची शिफारस करतो. त्याचप्रमाणे शासनाने पर्यावरण संरक्षणासाठी पारित केलेले सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी. मी कंपनीच्या पर्यावरण सल्लागारांचे अभिनंदन करतो. त्यांनी अत्यंत सविस्तर पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेला आहे. मी प्रकल्प व्यवस्थापनाचे प्रकल्पाबद्दल अभिनंदन करतो.

मी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना पर्यावरण अनुमती प्रदान क्रण्याचा वेळ कमी करण्याची सूचना करत आहे. सहसा २-३ वर्षे पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यसाठी लागतात. त्यामुळे शासनाचा महसूल, स्थानिकांना रोजगार

यासाठी विलंब होतो. तर ६०/९०/१२० दिवसात पर्यावरण अनुमती प्राप्त होणे गरजेचे आहे, अशी शिफारस मी भारत सरकारला करत आहे.

शेवटी मी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची भारत सरकारला शिफारस करण्याची विनंती करत आहे.

- **पर्यावरण सल्लागार यांनी** श्री सुनंदा रेड्डी यांना त्यांच्या सूचनांबद्दल धन्यवाद दिले. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकांनी ३५% हरितपट्टा विकास करण्याचे नियोजन केलेले आहे. आम्ही भूगर्भाती जल कुठल्याही परिस्थितीत प्रदूषित करणार नाही. मात्र आम्ही पावसाचे पाणी संवर्धन (Rain Water Harvesting) योजना राबविणार आहोत. आम्ही surface storage करणार आहोत. जे पावसाचे पाणी वाहून जाते, ते आम्ही अडवणार नाही. तर रुफटॉप रेन वॉटर स्टोरेज करणार आहोत. आम्ही सहा दिवसांचे साठवण क्षमता देणार आहोत. त्यामुळे जास्तीतजास्त १८० केएलडी पाणी साठवण होणार आहे. औद्योगिक भूखंड हा लहान असतो. तरी आम्ही आमच्या भूखंड/Mother Earth वर ३३% हरितपट्टा विकसित करणार आहोत. त्याचप्रमाणे हरितपट्टा विकासासाठी आम्ही स्थानीक स्वराज्य संस्थेशी चर्चा करणार आहोत, मात्र औद्योगिक वसाहतीजवळ फळे झाडे लावण्यास ब-याचवेळी परवानगी देण्यात येत नाही, कारण सिंथेटीक प्रकल्प, रासायनिक प्रकल्प असतात, तर स्थानिक स्वराज्य संस्थेने जर परवानगी दिली तर फळझाडेसुध्दा लावण्यात येतील.

तसेच पूर्वी औद्योगिक वसाहतीत भूगर्भ जल पुनर्भरण (Ground Water Recharge) करण्यास परवानगी होती. आता ती करण्याची परवानगी नाही. जर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ फळझाडे लावण्यास परवानगी देत असेल, तर आम्ही त्याची निश्चितच अंमलबजावणी करु.

६) <u>बी. चंद्रसेखर, पर्यावरण कार्यकर्ता, हैद्राबादः-</u>

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे. जोरिंको स्पेशॅलिटी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसाठी पर्यावरण अनुमतीसाठी आयोजित केलेल्या पर्यावरणविषयक जनसुनावणीबद्दल स्वागत. मी काही सूचना देत आहे -

प्रकल्पात व प्रकल्प परिसरात हरितपट्टा विकसित करण्यात यावा, सीएसआर निधी प्रकल्प परिसरातील गावात वापरण्यात यावा, स्थानिक लोकांना रोजगार देण्यात यावा, प्रकल्पातील ईटीपी ही योग्यप्रकारे हातळण्यात यावा, प्रकल्पात कामगारांना सुरक्षितता उपकरणे उपलब्ध करुन देण्यात यावीत, मी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना जोरिंको स्पेशॅलिटी कंपनीस पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची शिफारस करत आहे.

- **पर्यावरण सल्लागार** यांनी केलेल्या सूचनांबद्दल धन्यवाद दिले, पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ईटीपी बाबत सूचना करण्यात आलेली आहे. तर सादरीकरणात माहिती देण्यात आलेली आहे की प्रकल्पात घरगुती सांडपाणी ४.५ केएलडी, तर औद्योगिक सांडपाणी ३.५ केएलडी निर्माण होईल. तर औद्योगिक सांडपाण्यावर टर्शरीपर्यंत प्रकिया करणार आहोत. तर ईटीपीची क्षमता ही ७.० केएलडी असणार आहे. म्हणजे ईटीपीची क्षमता ही औद्योगिक सांडपाणी निर्मिती क्षमतेच्या दुप्पट आहे. तसेच प्रकल्पात घरगुती सांडपाण्याची निर्मिती ही ४.५ केएलडी होणार आहे. तर त्यासाठी ६.० केएलडी क्षमतेचा एसटीपी बांधणार आहोत. आम्ही सर्व प्रक्रिया केलेले सांडपाणी उत्पादन प्रक्रियेतच वापरणार आहोत.
- **संयोजक**, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन केले.

**७) <u>श्री अक्काल्लाय्या, पर्यावरण एनजीओ, हैद्राबादः-</u>**

प्रकल्प क्षेत्रात हरितपट्टा विकसित करण्यात यावा. दर सहा महिन्याने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येऊन त्याठिकाणी स्थानीकांच्या सर्व शारीरिक तपासण्या करण्यात याव्यात. स्थानिकांसाठी वाचनालय चालू करण्यात यावे. मी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सदरहू प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची शिफारस करत आहे.

- **पर्यावरण सल्लागार** यांनी उपस्थित केलेल्या सूचनांबद्दल धन्यवाद देताना सांगितले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सांगितल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य तपासणी आयोजित करणार आहे. तसेच स्थानिकांनी वाचनालयाची मागणी केल्यास ती निश्चितपणे पूर्ण करण्यात येईल. स्थानिकांच्या मागणीनुसार व मा. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीनेच खर्च करण्यात येईल.

**८) <u>श्री वैभव वरबडे, राहणार-तळेगाव,जिल्हा-पुणेः-</u>**

मी तळेगावहून आलेलो आहे. जर मला प्रकल्पात नोकरी करावयाची असल्यास मी कुठे अर्ज द्यावा.

- प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की नोकरीसाठी वेबसाईटवर अर्ज करु शकता. मात्र प्रकल्पाचा बांधकाम टप्पा हा जुलै, २०२४ च्या दरम्यान चालू होईल. समजा पर्यावरण अनुमती जानेवारी, २०२४ पर्यत प्राप्त झाल्यास प्रकल्पाचा बांधकाम टप्प्यास ६-७ महिने लागतील. प्रकल्प संपूर्णपणे कार्यान्वित जुलै, २०२४ पर्यत होऊ शकतो.

- **संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन केले.
- येथे **श्री शाम चंद्रकांत धुमाळ, राहणार -कासार अंबोली, तालुका-मुळशी, जिल्हा-पुणे** यांनी मत मांडले की आताच प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्प कार्यान्वित जुलै, २०२४ ला होऊ शकतो. तर माझी प्रकल्प व्यवस्थापनास विनंती आहे की ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराची संधि प्रकल्पात द्यावी.
- **प्रकल्प प्रवर्तकांनी** स्थानिक महिलांना प्रकल्पात रोजगाराची संधि निश्चितपणे देण्याचे आश्वासन दिले.
- **संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** मत मांडले की बैठकीत उपस्थितांनी ब-याच सूचना केलेल्या असून त्यास प्रकल्प प्रवर्तक आणि पर्यावरण सल्लागार यांनी समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. तरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीतर्फे विनंती करण्यात येते की प्रकल्पात स्थानिक लोकांना रोजगाराची जास्तीतजास्त संधि देण्यात यावी, मग प्रकल्प बांधकाम टप्प्यात असो की प्रकल्प पूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर असो. आता स्थानिकांमध्ये सुशिक्षितांचे प्रमाण मोठे आहे. तरी परिसरातील ग्रामपंचायत कार्यालयास किंवा स्थानिक सेवानियोजन कार्यालयास संपर्क साधून जास्तीतजास्त स्थानिकांनाच प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी. तसेच केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन जे वेळोवेळी पर्यावरण निर्देश पारित करेल, त्यांची अंमलबजावणी करावी, त्यामुळे येथील पर्यावरणाचे प्रकल्पामुळे नुकसान होऊ नये.

बैठकीचा समारोप करताना **संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की, ही जनसुनावणी आपले विचार, सूचना, टीका टिप्पणी यांची नोंद घेण्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून येथे कोणताही निर्णय घेण्यात येत नाही. उपस्थितांनी योग्य प्रकारे सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत.

**संयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रतिनीधी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानून मा. अध्यक्षा यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेल्या ०३ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

(विद्यासागर किल्लेदार)
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

(प्रशांत गायकवाड)
प्रतिनिधी,
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

(ज्योती कदम)
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे
जिल्हा - पुणे.